# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५ / फाल्गुन २९, १९४६ (शके)**

**(१) उप मुख्यमंत्री**
**(२) उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्ये मंत्री**
**(३) शालेय शिक्षण मंत्री**
**(४) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**
**(५) पणन, राजशिष्टाचार मंत्री**
**(६) क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्री**
**(७) अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री**
**(८) वस्त्रोद्योग मंत्री**
**(९) सहकार मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३२**

---

### राज्यातील शाळांमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत

**(१) * ३३१ श्री.किरण सरनाईक, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.अरुण लाड, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वच शाळांमध्ये विद्यार्थी विशेषत: मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून वर्गखोल्या आणि शाळा परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे दिनांक २१ ऑगस्ट,२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये बंधनकारक केले असतानाही अनेक शाळांमध्ये तसेच तेल्हारा (जि.अकोला) येथील १७० नगरपरिषद शाळा व खाजगी शाळांपैकी १११ शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले नसल्याचे तसेच हिंगोली जिल्ह्यातही ७० टक्के शाळांनी शासनाचा आदेश असतानाही सीसीटीव्ही कॅमेरे बसविले नसल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जळगाव जिल्ह्यातील माध्यमिक, उच्च माध्यमिक अनुदानित, विनाअनुदानित सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे न बसविल्यास शाळेची मान्यता रद्द करणेबाबत माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद, जळगाव यांचेकडून अध्यादेश काढण्यात आले असल्याचेही दिनांक १३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शाळांमध्ये मुलींवरील अत्याचाराच्या घटनांमुळे पालक वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, मुलींच्या सुरक्षिततेविषयी शाळांमध्ये समुपदेशन करण्यात येत असल्याचे तसेच मुलींना

समुपदेशन करण्याचे काम पुरुष शिक्षकांऐवजी महिला शिक्षिका अधिक चांगल्या पध्दतीने करु शकतील, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनेक खाजगी शाळांमध्ये निधी अभावी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले नसून सांगली, अकोला व हिंगोली जिल्ह्यातील १५०४ शाळांनी सदर आदेशाचे पालन केले असून उर्वरित शाळांनी अद्यापही ४ महिन्यांचा कालावधी होवूनही सीसीटीव्ही कॅमेरे बसविले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, दिनांक २१ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये आदेशाचे पालन न करणाऱ्या शाळांवर कोणती कारवाई केली तसेच मुलींना समुपदेशनाचे काम पुरुष शिक्षकांऐवजी महिला शिक्षिकांना देण्याबाबत व खाजगी शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याकरीता निधीची तरतूद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

(५) व (६) खाजगी शाळांनी स्वखर्चाने सीसीटीव्ही बसविण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल सु-मोटो जनहित याचिका क्र.०१/२०२४ च्या अनुषंगाने दिनांक ०३/०९/२०२४ रोजी दिलेल्या आदेशानुसार, शासन निर्णय दिनांक २६/०९/२०२४ अन्वये सेवानिवृत्त न्यायाधीश, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. या समितीने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसंदर्भात करावयाच्या उपाययोजनांच्या शिफारशीचा सविस्तर अहवाल शासनास सादर केला आहे. यामध्ये मुलींना शाळेत उपलब्ध असलेल्या महिला शिक्षिकांमार्फत समुपदेशन करण्याबाबतची जबाबदारी देण्याबाबत शिफारस करण्यात आली आहे.

-----------------

## राज्यातील आदिवासी, ग्रामीण व अल्पसंख्यांक विभागातील शाळांकरीता शिक्षक मंजुरीचे निकष शिथिल करणेबाबत

**(२) * ७२५ श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी, ग्रामीण व अल्पसंख्यांक विभागाकरीता दिनांक २८ ऑगस्ट, १९८० रोजीच्या शासन निर्णयातील शिक्षक मंजुरीचे निकष शिथीलक्षम असून प्रत्यक्षात आदिवासी, ग्रामीण व अल्पसंख्यांक प्रकारच्या शाळांमधील शिक्षकांची पदे निश्चित करताना शिक्षक मंजुरीचे प्रचलित निकषांमध्ये कोणतीही शिथिलता प्रदान करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी, ग्रामीण आणि अल्पसंख्यांक शाळांतील शिक्षकांची पदे कमी झाल्यामुळे प्रत्येक तुकडीकरीता विषयवार शिक्षक उपलब्ध होत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी, ग्रामीण भागातील तसेच अल्पसंख्यांक संस्थांच्या शाळेतील शिक्षकांची पदे निश्चित करण्याचे निकष शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मध्ये शिक्षक मंजूर करताना आदिवासी, ग्रामीण व अल्पसंख्यांक संस्था संचलित संबंधित शाळेकरीता वेगळया निकषाची अधिनियमात तरतूद नाही. शासन निर्णय दिनांक १५/०३/२०२४ नुसार प्राथमिक शाळेकरीता शिक्षकांची पदे अनुज्ञेय करण्याचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयानुसार विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात आवश्यकतेनुसार पदे मंजूर करण्यात येतात.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय क्रीडा संकुल समितीतील कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहाराबाबत

**(३) * ८३४ श्री.अंबादास दानवे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय क्रीडा संकुल समितीत २१ कोटी ५९ लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची आर्थिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी सुरु असून अपहारकर्त्याने ही रक्कम कशासाठी व कोणासाठी वापरली याची पोलिसांना अद्याप माहिती प्राप्त झाली नसल्याचे त्याचदरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गत तीन वर्षांपासून उपसंचालक पदावर प्रभारी अधिकाऱ्यांची नियुक्ती झाल्याने तसेच प्रभारी अधिकाऱ्यांकडे इतर जिल्ह्यांच्या जबाबदाऱ्या असल्याने कामकाजावर विपरित परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने क्रीडा संकुलाच्या पारदर्शक व प्रभावी कामकाजासाठी उपसंचालक पदावर पूर्णवेळ अधिकारी नेमून विभागीय क्रीडा संकुल समितीत २१ कोटी ५९ लाख रुपयांचा गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) या प्रकरणाची आर्थिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी सुरु असून अपहारीत रक्कमेतून खरेदी केलेल्या स्थावर आणि जंगम मालमत्ता पोलिसांकडून जप्त करण्यात आलेली आहे.

(३) छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर येथील उपसंचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार माहे जानेवारी, २०२१ ते माहे सप्टेंबर, २०२३ या कालावधीत श्री.सुहास पाटील, उपसंचालक व माहे सप्टेंबर, २०२३ ते माहे डिसेंबर, २०२४ पर्यंत श्री.संजय सबनीस, उपसंचालक यांचेकडे सोपविण्यात आलेला होता.
(४) व (५) पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, छत्रपती संभाजीनगर यांचे दिनांक १६/०१/२०२५, ३१/१/२०२५ व २४/२/२०२५ च्या पत्रानुसार सदर गुन्ह्याच्या तपासात क्रीडा विभागाच्या एका कर्मचाऱ्यासह एकूण ११ आरोपीना अटक करण्यात आलेली असून क्रीडा विभागाच्या संबंधित कर्मचाऱ्यास निलंबित करण्यात आले आहे. सर्व आरोपींविरुध्द सबळ पुरावे हस्तगत करून मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याची पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत कार्यवाही सुरू आहे. तसेच, संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे विरूध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला असून त्यावर शासनस्तरावरून कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या धाराशीव येथील उपकेंद्रास शैक्षणिक क्षेत्र घोषित करण्याबाबत

**(४) * २३९ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची स्थापना सन १९५६ मध्ये झाली असून विद्यापीठाने धाराशीव येथे सन २००४ मध्ये उपकेंद्राची स्थापना केली असून, शासनाकडून सदर उपकेंद्रासाठी एमआयडीसीच्या माध्यमातून ६० एकर जमीन देण्यात आली, परंतु एमआयडीसीला प्रतिवर्षी सेवा शुल्क म्हणून रुपये ३० लक्ष अदा करावे लागत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यापीठ उपकेंद्रांतर्गत विकासकामे विद्यापीठ स्वत:च्या आर्थिक स्त्रोतातून करते, परंतु विकासकामे करणेसाठी प्रत्येक वेळी एमआयडीसीची परवानगी घ्यावी लागत असून सदर भूखंड एमआयडीसीमधून मुक्त करुन शैक्षणिक क्षेत्र म्हणून घोषित करण्याबाबतची विद्यापीठाची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एमआयडीसीने धाराशीव येथील विद्यापीठ उपकेंद्रास दिलेला भूखंड शैक्षणिक क्षेत्र म्हणून घोषित करणे व बांधकाम विकासकामे करण्यासाठी एमआयडीसीची तांत्रिक मान्यता घेणेबाबतची अट रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर उपकेंद्रासाठी महाराष्ट्र औद्योगिकविकास महामंडळामार्फत प्रती वर्ष रु.७.२० लक्ष एवढे शुल्क आकारण्यात येत आहे.
(२) हे खरे आहे.
(३) महाराष्ट्र औद्योगिकविकास महामंडळ औद्योगिक क्षेत्राकरीता विशेष नियोजन प्राधिकरण असल्याने औद्योगिक क्षेत्रातील सर्व भूखंडधारकास विकास कामे करण्याकरीता महामंडळाच्या स्थानिक नियोजन प्राधिकाऱ्याकडून विकास परवानगी घेणे आवश्यक आहे. सेवा शुल्क माफ करणे तसेच शैक्षणिक क्षेत्र

घोषित करण्याबाबत महाराष्ट्र औद्योगिकिवकास महामंडळाचे कोणतेही धोरण नाही. महाराष्ट्र औद्योगिकिवकास महामंडळाने सेवा शुल्क माफ करण्याचा प्रस्ताव अमान्य केला आहे.
(४) प्रश्न उद्धवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्थांना नियमबाहयपणे कामे दिल्याबाबत

**(५) * २१ श्री.विक्रांत पाटील, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात १०४ मजूर सहकारी संस्था असून जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद तसेच इतरही ठिकाणी या मजूर संस्था निविदा प्रक्रियेत सहभागी होत असतात, या सर्व मजूर सहकारी संस्थांना समान न्याय न देता अचलपूर जलसंपदा विभागाने नियमबाहयपणे ठराविक संस्थांना कोट्यवधी रुपयांची कामे दिल्याची तक्रार उपनिबंधकाकडे करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अचलपूर येथील जलसंपदा विभागाने काळया यादीतील मजूर सहकारी संस्थांनाच मोठ्या प्रमाणात कामे दिल्याची तक्रार करण्यात आल्यानंतर जिल्ह्यातील १३ संस्थांना दिनांक ३ डिसेंबर, २०२४ रोजी जिल्हा उपनिबंधकांनी काळया यादीत टाकले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जलसंपदा विभागाने काळया यादीतील ठराविक मजूर सहकारी संस्थांना नियमबाहयपणे मोठ्या प्रमाणात कामे दिल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने नियमांचे उल्लंघन करुन कोट्यवधी रुपयांच्या निविदांची कामे देणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

प्रश्नाधिन विषयासंबंधी दिनांक ०६/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये तक्रार प्राप्त झाली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २३/०७/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार मजुर सहकारी संस्थांना वर्षभरात एकूण १ कोटी मर्यादेपर्यंतची कामे करण्याची मर्यादा दिलेली आहे. तथापि, आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये १ कोटी पेक्षा जास्त रक्कमेची कामे घेतल्याबद्दल दिनांक ०६/११/२०२३ रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी संबंधित १३ मजुर संस्थांना दिनांक २५/११/२०२४ पासून पुढील १ वर्षापर्यंत कामे घेण्यापासून प्रतिबंधीत केले असून प्रतिबंधीत संस्थांनी दिनांक २५/११/२०२४ च्या आदेशानंतर ई-निविदा किंवा विनानिविदा कामाकरीता मागणी अर्ज केल्यास ग्राहय धरण्यात येवू नये, असे आदेश निर्गमित केले आहेत.

(३) होय.

प्रतिबंधीत संस्थांनी दिनांक २५/११/२०२४ च्या आदेशापूर्वी जर ई-निविदा भरली असेल किंवा विनानिविदा काम मागणी अर्ज केला असेल किंवा उपनिबंधक कार्यालयाकडून कामाबाबत शिफारस केली

असेल अशा संस्थांची कामे ग्राह्य धरण्यात यावी, असे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी संबंधित प्रशासकीय विभागांना दिनांक ०३/१२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

मध्यम व लघु पाटबंधारे विभाग, अचलपुर यांच्याकडील निविदा सूचना दिनांक ०३/०९/२०२४ रोजीची असून, १३ मजुर कामगार सहकारी संस्थेपैकी दोन संस्थांनी दिनांक २५/११/२०२४ पुर्वीच ई-निविदा भरली असल्याने सदर ई-निविदा ग्राह्य धरण्यात आली आहे. त्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्याची बाब उद्भवली नाही, असे जलसंपदा विभागाने कळविले आहे.

(४) प्रतिबंधीत केलेल्या मजुर संस्थांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांच्या दिनांक २५/११/२०२४ रोजीच्या आदेशाविरुध्द दाखल केलेल्या अपिलावरील सुनावणी दरम्यान विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी उपनिबंधक, अमरावती यांच्या दिनांक २५/११/२०२४ रोजीच्या आदेशाला सद्य:स्थितीत स्थगिती दिली असून, सदर अपिलावर सुनावणी सुरु आहे.

-----------------

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथील इनक्युबेशन सेंटरचा प्रलंबित निधी देण्याबाबत

**(६) * ४१५ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथे उद्योजकता वाढीस लागण्यासाठी इनक्युबेशन सेंटरच्या प्रकल्पाला ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून त्यापैकी १.७३ कोटी रुपये निधी नागपूर विद्यापीठाला प्राप्त झाल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर विद्यापीठाला उर्वरित संपूर्ण निधी देऊन इन्क्युबेशन सेंटर सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर अंतर्गत असणाऱ्या तत्कालिन लक्ष्मी नारायण तांत्रिक संस्थेस प्रयोगशाळा व इन्क्युबेशन सेंटरकरीता विविध उपकरणे खरेदी करण्यासाठी दिनांक ०८/०६/२०२२ च्या शासन निर्णयान्वये रुपये १.७४ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती व त्याप्रमाणे दिनांक ०३/१०/२०२२ च्या शासन निर्णयान्वये रुपये १.७४ कोटी एवढा निधी नागपूर विद्यापीठास वितरीत करण्यात आला होता.सदरहू संस्थेचे लक्ष्मी नारायण अभिनव तंत्रज्ञान नागपूर विद्यापीठात रुपांतर झाले आहे. सबब, नागपूर विद्यापीठाने लक्ष्मी नारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ, नागपूर विद्यापीठास दिनांक २३/०२/२०२४ रोजी रुपये १.७४ कोटी निधी हस्तांतरीत केला आहे.

(२) सदर सेंटरकरीता उपकरणे खरेदी करण्यासाठी संपूर्ण निधी वितरीत करण्यात आला आहे. इन्क्युबेशन सेंटर विद्यापीठाच्या नविन इमारतीत (Research Center) करण्याचे प्रस्तावित आहे. सदर इमारतीच्या

तळमजल्याचे काम ऑगस्ट, २०२५ पर्यंत पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे. त्यानुसार सदरची खरेदी प्रक्रिया ऑगस्ट, २०२५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तेल्हारा (जि.अकोला) येथील तालुका क्रीडा संकुलाची दुरवस्था झाल्याबाबत

**(७) * ८४५ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यातील तालुका क्रीडा संकुल हे उदयोन्मुख खेळाडू व विद्यार्थी यांच्याकरीता एकमेव सराव करण्याचे ठिकाण असून या क्रीडा संकुलाची निधी अभावी दुरवस्था झाल्याने खेळाडू, विद्यार्थी, शासकीय अधिकारी, ज्येष्ठ नागरिक व्यायाम व सराव करण्यासाठी येणारे नागरिक यांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुका क्रीडा अधिकारी पद अनेक वर्षापासून रिक्त असून या पदाचा अतिरिक्त कार्यभार जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे असून क्रीडा संकुलाची देखभाल करण्यासाठी कायमस्वरुपी कर्मचारी आणि प्रशिक्षकही उपलब्ध नाही त्यामुळे विद्यार्थी व विविध खेळ प्रकारातील खेळाडू यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी क्रीडा संकुलाची दुरुस्ती करण्याबाबत तसेच तालुका क्रीडा अधिकारी हे पद कायमस्वरुपी भरण्याबाबत व कर्मचारी तसेच प्रशिक्षक नियुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) तेल्हारा (जि.अकोला) तालुका क्रीडा संकुलामध्ये रुपये १००.०० लक्ष अनुदानातून २०० मीटर धावनपथ, इनडोअर बॅडमिंटन कोर्ट, बंदीस्त व ओपन जिम, विविध खेळाची मैदाने, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, कार्यालय, सी.सी.टि.व्ही, इ. सुविधा टप्पा टप्पाने निर्माण करण्यात आल्या असून खेळाडू व नागरिक लाभ घेत आहे. तसेच सुधारित अनुदान मर्यादेनुसार नवीन सुविधाच्या अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाची तांत्रिक मान्यता घेण्यात येत आहे. संकुलाच्या देखभाल दुरुस्तीसाठी शासन निर्णय दिनांक २५/२/२०२५ अन्वये सन २०२३-२४ या वर्षासाठी रुपये १,८१,४००/- व सन २०२४-२५ या वर्षासाठी रुपये ३.०० लक्ष निधी मंजूर करण्यात आला आहे.
(२), (३) व (४) अकोला जिल्ह्याकरीता एकूण ०२ तालुका क्रीडा अधिकाऱ्यांची पदे (मुर्तिजापूर व पातूर) मंजूर आहेत. सद्य:स्थितीत तालुका क्रीडा अधिकारी पदे मंजूर नसलेल्या तालुक्यांचा कार्यभार जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील कार्यरत तालुका क्रीडा अधिकारी, क्रीडा अधिकारी व क्रीडा मार्गदर्शक यांच्याकडे सोपविण्यात आलेला असून त्यानुसार तालुकास्तरावरील कामकाज चालू आहे. तालुका क्रीडा अधिकारी पद मंजूर नसलेल्या तालुकाकरीता पदनिर्मितीचा प्रस्ताव विचाराधीन आहे. तसेच तेल्हारा तालुका क्रीडा संकुल समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार बाह्यस्त्रोत यंत्रणेद्वारा एक क्रीडा मार्गदर्शक, एक लिपिक व एक सुरक्षा रक्षक यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

-----------------

## राज्यातील दिव्यांग शिक्षक कर्मचाऱ्यांच्या समायोजनाबाबत

**(८) * ५१ अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दृष्टीहीन १५७ व इतर दिव्यांग प्रवर्गातील ६१ अशा २१८ दिव्यांग शिक्षक कर्मचाऱ्यांच्या समायोजनासंदर्भात नागपूर व मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात बैठका झाल्या असून, या बैठकीमध्ये संबंधित कर्मचाऱ्यांच्या समायोजनाचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला होता, परंतु अद्याप या विषयावर मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा झालेली नसल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समग्र शिक्षा समावेशित शिक्षण अंतर्गत २१८ दिव्यांग शिक्षक कर्मचाऱ्यांच्या समायोजन प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (कोकण पदवीधर) यांनी शालेय शिक्षण मंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर दिव्यांग शिक्षक कर्मचाऱ्यांचा समायोजन प्रस्ताव शालेय शिक्षण विभागात प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू प्रस्ताव मंजुरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
याबाबत दिनांक २३/०८/२०२४ रोजी निवेदन प्राप्त झालेले आहे.
(३) व (४) याबाबत मा.मंत्रिमंडळाने दिनांक ३०/०९/२०२४ रोजी घेतलेल्या निर्णयास अनुसरून मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचे अनुपालन करण्याच्या दृष्टीने दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्यापनाकरीता समग्र शिक्षा योजनेंतर्गत कार्यरत विशेष शिक्षकांचे केंद्रस्तरावर एक याप्रमाणे ४८६० राखीव पदांवर समायोजन करण्याबाबत शासन निर्णय, दिनांक ०८/१०/२०२४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. यामध्ये २१८ दिव्यांग शिक्षक कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. यानुसार, शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र कक्ष स्थापन करून उमेदवारांची कागदपत्र पडताळणी छाननी करण्याबाबतच्या सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार, अशा विशेष शिक्षकांच्या कागदपत्रांची पडताळणी करून केंद्रस्तरावर एक याप्रमाणे प्रत्यक्ष पदस्थापना देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार असल्याने सदर कार्यवाहीस काही अवधी लागत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे आडगाव (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पोषण आहारातून विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याबाबत

**(९) * २०१ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आडगाव (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या पोषण आहारातून २४ विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विषबाधा झालेल्या विद्यार्थ्यांना पोषण आहार देणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत मौजे आडगाव ता.मोर्शी, जिल्हा अमरावती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील ५४ विद्यार्थ्यांना दिनांक २७ डिसेंबर, २०२४ रोजी पोषण आहार देण्यात आला होता.त्यापैकी ३१ विद्यार्थ्यांना उलटी, मळमळ, पोटदुखी हा त्रास झाल्यामुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.
(२) व (३) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत संबंधित शाळेतील स्वयंपाकी तथा मदतनीस यांना कामावरून कमी करण्यात आले आहे. संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक यांना निलंबित करुन विभागीय चौकशीची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच, अमरावती जिल्ह्यासाठी नियुक्त पुरवठेदार यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

तसेच, भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडून नयेत म्हणून याबाबतच्या उपाययोजना निश्चित करुन त्यानुसार स्थायी आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांना द्यावयाच्या शुल्कमाफीबाबत

**(१०) * ११७१ श्री.अरुण लाड, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२३ मध्ये १,०२१ महसुली मंडळापैकी विभाजन झालेल्या नवीन मंडळामध्ये दुष्काळी परिस्थिती घोषित करुन सवलती लागू करण्यासंदर्भात शिक्षण संचालनालयाने (उच्च शिक्षण) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा एक वेगळा आदेश काढून त्यानुसार विद्यापीठाकडून आलेल्या प्रस्तावानुसार ८५ हजार ७६९ विद्यार्थी पात्र असून त्यांना शुल्कमाफीचा लाभ मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यापीठाकडून शासनास प्राप्त झालेले प्रस्ताव हे निकषानुसार पाठविण्यात आले नसल्याने महाविद्यालयाकडून सुधारित प्रस्ताव पाठविण्याबाबत विद्यापीठ प्रशासनाला शासनाने कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यापीठांकडून त्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे तसेच विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१), (२) व (३) शासन निर्णय महसूल व वन विभाग दिनांक १६/०२/२०२४ अन्वये दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित केलेल्या १०२१ महसूल मंडळापैकी विभाजन झालेल्या नविन महसूल मंडळांमध्ये दृष्काळसदृश्य परिस्थिती घोषित करुन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना परीक्षाशुल्क माफीची सवलत अनुज्ञेय केलेली आहे.

त्यानुसार उच्च शिक्षण संचालनालय स्तरावरुन त्यांचे पत्र दिनांक २३/०२/२०२४ अन्वये विद्यापीठांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या सन २०२३-२४ च्या दृष्काळसदृश्य तालुक्यातील विद्यार्थ्यांची परीक्षा फी प्रतिपूर्ती करण्यासाठी महाविद्यालयनिहाय आवेदन पत्रांवरुन प्रतिपूर्ती रकमेची परिगणना करुन आवश्यक प्रस्ताव विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेकडे सादर करावा सदर प्रस्तावांची तपासणी करुन विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी आवश्यक रकमेची मागणी उच्च शिक्षण संचालनालय यांचेकडे करावी, अशा सुचना देण्यात आल्या.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर यांनी ८५,७६९ विद्यार्थ्यांची परीक्षा फी प्रतिपूर्ती करण्यासाठी रुपये ५.५२ कोटी एवढया रकमेचा प्रस्ताव त्यांचे पत्र दिनांक १/०६/२०२४ अन्वये थेटपणे संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना सादर केला होता.संचालक, उच्च शिक्षण पुणे यांनी सदर प्रस्ताव तपासणी करण्यासाठी विभागीय सहसंचालक, छ.संभाजीनगर यांचेकडे पाठविला.

विभागीय सहसंचालक, छ.संभाजीनगर यांनी सदर प्रस्तावाची तपासणी करुन ३१,७१२ एवढया पात्र विद्यार्थ्यांसाठी २.३८ कोटी एवढया रकमेचा प्रस्ताव संचालक, उच्च शिक्षण यांना सादर केला. त्यानुसार सदर ३१,१७२ पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करण्यासाठी अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात येऊन परीक्षा शुल्क माफीचा लाभ देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जेनेरिक औषधांच्या किंमतीवर शासनाचे नियंत्रण नसल्याबाबत

**(११) * १३३७ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेनेरिक औषधांच्या किंमतीवर शासनाचे कोणतेही नियंत्रण नसल्याने रुग्णांना औषध दुकानातून वेगवेगळया कंपनीची औषधे घ्यावी लागत असल्याने सर्वसामान्य रुग्णांना शासकीय दवाखान्यात मोफत मिळणाऱ्या औषधांसाठी मोठा आर्थिक भुर्दंड बसत असल्याचे तसेच पुणे शहरात एकच औषध प्रत्येक मेडिकलमध्ये वेगवेगळया किंमतीला विकले जात असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जेनेरिक औषधे खरेदी करणे आवश्यक असले तरी आसपास जेनेरिक मेडिकल दुकाने उपलब्ध नसतात आणि खाजगी मेडिकलमध्ये औषध घ्यायचं तर औषधांच्या किंमती महाग असल्यामुळे तसेच एकाच औषधाच्या वेगवेगळया किमतींमुळे सामान्य नागरिकांची आर्थिक पिळवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे शहरात प्रत्येक मेडिकलकडे एकच औषध वेगवेगळया कंपनीचे उपलब्ध असून विविध मेडिकल दुकानात वेगवेगळया दराने मिळत आहेत तसेच शासनाने जेनेरिक औषधांच्या दरात

समानता आणून सर्व शासकीय रुग्णालय परिसरात जेनेरिक औषधे उपलब्ध करून देण्याबाबत तसेच जेनेरिक औषधांची दुकाने वाढविण्याबरोबरच औषधांच्या किंमतीवर निर्बंध लादण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या केमिकल्स व फर्टीलायझर मंत्रालयाच्या औषध किंमत नियंत्रण आदेश, २०१३ अन्वये औषधांच्या किंमती नियंत्रित केल्या जातात. औषधे व सौंदर्य प्रसाधने नियमांतर्गत वर्गीकृत औषधे हे डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनवरच विकले जाऊ शकतात. डॉक्टरांद्वारा जी औषधे प्रिस्क्रिप्शनवर नमूद केले जातात तीच औषधे किरकोळ औषध विक्रेत्यांनी विकत देणे अनिवार्य आहे.

कोणतीही व्यक्ती/ औषध विक्रेता औषधांच्या अधिकतम मुल्य (MRP) पेक्षा जास्त किंमतीने औषध विक्री करू शकत नाही.

(२) जेनेरीक औषध विकत घेणे किंवा ब्रॅन्डेड औषध विकत घेणे ही बाब डॉक्टरांनी जी औषध त्यांच्या प्रिस्क्रिप्शनवर लिहून दिली आहेत त्यावर अवलंबून आहे. जर जेनेरीक औषध नमूद असेल तर जेनेरीक औषध व ब्रॅन्डेड औषध नमूद असेल तर ब्रॅन्डेड औषध विक्री करणे किरकोळ औषध विक्रेत्यांस बंधनकारक आहे.

(३) पुणे शहरात प्रत्येक मेडिकलकडे एकच औषध वेगवेगळया कंपनीचे उपलब्ध असून विविध मेडिकल दुकानात वेगवेगळया दराने मिळत असल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नाही. मात्र औषधांच्या किंमतीवर केंद्र शासनाच्या केमिकल्स व फर्टीलायझर मंत्रालयाच्या औषध किंमत नियंत्रण आदेश, २०१३ द्वारे नियंत्रण ठेवण्यात येते.

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्नित १८ रुग्णालयांच्या परिसरामध्ये सन २०१९ मध्ये जेनेरिक औषधी दुकाने एनजीओ/संस्था/सहकारी संस्था यांच्यामार्फत सुरू करण्यात आली आहेत. तसेच, उर्वरित १८ रुग्णालयांमध्ये जेनेरिक औषधी दुकाने नॅकोफ या संस्थेमार्फत सुरू करण्यास दिनांक ०१/०३/२०२४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान केली आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत चालविण्यात येणाऱ्या रुग्णालयांच्या परिसरात सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये (उपकेंद्रे वगळून) मे. नॅकोफ इंडिया लिमिटेड या संस्थेस जेनेरीक औषधांची दुकाने स्थापन करण्याकरीता दिनांक ३१/०७/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## चिपळूण नागरी सहकारी पतसंस्था मर्या. (जि.रत्नागिरी) संस्थेतील गैरव्यवहारांची चौकशी करणेबाबत

**(१२) *१४२२ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) चिपळूण नागरी सहकारी पतसंस्था मर्या. (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या संस्थेमध्ये सहकार कायदा व संस्थेचे मंजूर पोटनियम डावलून नियमबाह्य कामकाज सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सभासद व कर्मचारी यांना नियमबाह्य कर्ज वितरण तसेच संस्थेचे अधिकारी / कर्मचारी, नातेवाईकांच्या ठेवीवर जादा व्याज दर देऊन ठेवी स्वीकारणे, सभासदांना भाग दाखले न देणे, संस्थेच्या संचालक मंडळातील सदस्यांकडे थकबाकीची रक्कम असून सुद्धा वार्षिक अहवालात जाणीवपूर्वक न दाखविणे, संस्थेच्या सभासद कर्जाची वसुली करताना प्रत्यक्षात वसुली न करता कोट्यवधी रुपये कर्जाचे नुतनीकरण करून देणे, अशा प्रकारे गैरव्यवहार सुरु असून संस्थेवर प्रशासक नियुक्त करून संस्थेच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.सहकार मंत्री, सचिव (सहकार), अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांचेकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर पतसंस्थेच्या आर्थिक व्यवहाराची चौकशी करणेसाठी प्रशासक नियुक्त करण्याबाबत तसेच गैरव्यवहार करणारे संस्थेचे पदाधिकारी, सभासद, अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

यासंदर्भात प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सहकार आयुक्त कार्यालयाकडून चौकशी करण्याकरीता दिनांक ०३/०२/२०२५ रोजी खालीलप्रमाणे प्रथकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

१. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-पथक प्रमुख

२. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, माणगांव, जि.रायगड - सदस्य

३. लेखापरिक्षक, श्रेणी-२ सहकारी संस्था, पणन, रायगड- सदस्य

चौकशीसाठी नियुक्त पथकाचा तपासणी अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगोला तालुक्यातील (जि.सोलापूर) शालेय पोषण आहार ठेवण्यात येणाऱ्या गोदामांबाबत

**(१३) * १४४१ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला तालुक्यातील (जि.सोलापूर) शाळांमध्ये पुरवठा केला जाणारा शालेय पोषण आहार ठेवण्याच्या गोदामामध्ये उंदराच्या व घुशीची विष्ठा आढळून आल्याचे सामाजिक कार्यकर्त्यांनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोषण आहार सांगोला तालुक्यातील सर्व शाळांमध्ये पोहोचविला जात असून गोदामामध्ये ठेवल्या जाणाऱ्या पोषण आहाराकडे केलेल्या अक्षम्य दुर्लक्षामुळे विषबाधा होऊन

विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शालेय पोषण आहाराचे संनियंत्रण करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

बहुजन भारत सामाजिक संघटना, महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या तक्रारीनुसार संबंधित गटविकास अधिकारी व अधीक्षक (शापोआ) यांनी कमलापूर (ता.सांगोला, जि.सोलापूर) येथील शालेय पोषण आहाराच्या गोदामास भेट दिली असता गोदामामध्ये उंदराची व घुशीची विष्ठा आढळून आली.
(२) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत संबंधित पुरवठेदारास योजनेची अंमलबजावणी व स्वच्छतेबाबत दक्षता घेण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.
(३) व (४) सदर गोदामामधील तांदुळ व धान्यादी मालाची तपासणी करण्याकरीता नमूने प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले होते. सदर प्रयोगशाळा तपासणी अहवालामध्ये प्रस्तुत धान्यादी माल भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाने निश्चित केलेल्या प्रमाणानुसार असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तसेच, भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडून नयेत म्हणून याबाबतच्या उपाययोजना निश्चित करुन त्यानुसार स्थायी आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## मुंबईत दुधात भेसळ करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१४) * २१७८ श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये दुधात भेसळ होत असल्याच्या तक्रारी वाढत असल्याने, मा.अन्न व औषध प्रशासन मंत्री महोदयांनी मुंबईतील मुलुंड, वाशी, ऐरोली आणि मानखुर्द या चार चेकनाक्यांवर छापे टाकून मुंबईत येणाऱ्या दुधाच्या टँकरमधील दुधाची तपासणी दिनांक १३ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.अन्न व औषध प्रशासन मंत्री महोदयांच्या निदेशानुसार अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांनी ९८ टँकरमधील दुधाची तपासणी केली असून यामध्ये गाईचे दूध, पाश्चराइज्ड होमोजिनाइज्ड टोन्ड दूध, डबल टोन्ड दूध यांचा समावेश होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तपासणी दरम्यान मानखुर्द येथे निकृष्ट दर्जाचे भेसळयुक्त दूध आढळून आल्याने एक वाहन परत पाठविण्यात आले असून, दुधात भेसळ करून सामान्य नागरिकांचे आरोग्य धोक्यात आणणाऱ्या संबंधित दोषींवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत कोणती कारवाई केली तसेच दूध भेसळ रोखण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही / उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर चेकनाका मोहिमेअंतर्गत अन्न व औषध प्रशासनामार्फत मुंबईतील मुलुंड, वाशी-मानखुर्द, ऐरोली

आणि दहिसर या चार चेकनाक्यांवर एकूण १०० वाहनांमधील दुधाची तपासणी करण्यात आली असून त्यामध्ये विविध ब्रँडचे पॅकबंद स्वरूपातील Pasteurized Homogenized Cow Milk, Pasteurized Homongenized Toned Milk, Double Toned Milk, Pasteurized Full cream Milk इत्यादी तसेच सुट्या स्वरूपातील Cow Milk, Buffalo Milk इत्यादीचा समावेश आहे.

(३) सदर चेकनाका मोहिमेदरम्यान वाशी-मानखुर्द चेक नाका येथे एका वाहनामधील (Tanker) Pasteurized Homogenized Cow Milk या अन्नपदार्थामध्ये प्रथमदर्शनी फॅट व एसएनएफ (SNF) चे प्रमाण मानकापेक्षा कमी आढळून आल्याने सदर दुधाचा कायदेशीर नमुना विश्लेषणासाठी घेऊन सदरचे वाहन दुधासहित परत पाठविण्यात आले. सदर अन्न नमुन्याचा विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यानंतर विश्लेषण अहवालाच्या अनुषंगाने अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. दूध भेसळीवर आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनामार्फत नियमितपणे, दूध भेसळ करणाऱ्यावर पाळत ठेवून किरकोळ विक्रेत्यांपासून ते उत्पादकापर्यंत सर्व दूध व्यवसाय करणाऱ्या आस्थापनांच्या तपासण्या करून विश्लेषणासाठी नमुने घेण्यात येतात. भेसळीचा संशय वाटल्यास दूध जप्त करून नष्ट केले जाते. कृषी व पदुम विभागाच्या दिनांक २८/०६/२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील जनतेला स्वच्छ व गुणवत्तापूर्ण दुधाचा पुरवठा होण्याच्या अनुषंगाने दूध व दुग्धजन्य पदार्थात होणारी भेसळ रोखण्यासाठी संबंधित जिल्ह्याचे अपर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरिय समिती गठीत करण्यात आली आहे. दूध व दुग्धजन्य अन्न पदार्थांतील भेसळीस प्रतिबंध घालण्यासाठी १०० दिवसांचे कार्यक्रमांतर्गत दिनांक १५/०१/२०२५ पासून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

मुंबई व ठाणे शहरामध्ये येणारे दूध मानकाप्रमाणे आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी चेक नाका मोहीम राबविण्यात येते. सदर चेकनाका मोहिमेत दुधाची चाचणी त्याच ठिकाणी करून दूध कमी दर्जाचे आढळल्यास ते आलेल्या ठिकाणाकडे परत पाठविले जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय अधिकारी/कर्मचारी हे राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेचा लाभ घेत असल्याबाबत

**(१५)** * **१८६२ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना ही गरीब जनतेसाठी सुरु केली असून त्याचा लाभ शासकीय व निमशासकीय सेवेतील लाखो कुटुंबे घेत असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वित्त विभागाकडील सेवार्थ प्रणालीवरील शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची माहिती अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीवरील डाटाबेससोबत तपासण्यात आली असता १ लाखांहून अधिक शासकीय अधिकारी/ कर्मचारी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेचा लाभ घेत असल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचा लाभ घेत असलेल्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या शिधापत्रिका योग्य योजनेत वर्ग करणे आवश्यक असताना त्यासंदर्भात शासनस्तरावरुन कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचा लाभ घेत असलेल्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली तसेच सदर १ लाख कर्मचाऱ्यांऐवजी पात्र गरीब कुटुंबांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) व (२) अंशत: खरे आहे, वित्त विभागाकडील सेवार्थ प्रणालीवरील शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची माहिती विभागाच्या शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीवरील डाटाबेससोबत तपासण्यात आली असता राज्यातील १,००,२६२ एवढे शासकीय अधिकारी/कर्मचारी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेचा लाभ घेत असल्याचे दिसून आले.
(३) व (४) हे खरे नाही, राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचा लाभ घेत असलेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या शिधापत्रिका योग्य योजनेत वर्ग करण्याच्या सूचना सर्व क्षेत्रिय कार्यालयांना दिनांक ०९/०२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या. त्यानुसार क्षेत्रिय कार्यालयांकडील माहितीनुसार राज्यातील बहुतांश शिधापत्रिका शुभ्र योजनेत वर्ग करण्यात आल्या असून त्याऐवजी पात्र लाभार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्जधारकांची फसवणूक होत असल्याबाबत

**(१६) * २००० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून नियम क्रमांक ३५ चा भंग करण्यात येऊन कर्जधारकांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक करण्यात येत असून मुंबईतील अनेक बोगस संस्थाना कर्ज दिल्याचे दाखवून संचालक व प्रशासन यांनी कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, बँकेकडून कर्जदारांना मंजूर करण्यात आलेल्या कर्जाची रक्कम पूर्ण दिली जात नसल्याने कर्जदाराने ज्या कामासाठी कर्ज घेतले ते काम पूर्ण होत नसल्यामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्जाचे हप्ते भरण्याबाबत कर्जदारांवर वारंवार दबाव टाकण्यात येत असल्यामुळे कर्जदार दबावाखाली वावरत असून आत्महत्या करीत असल्याच्या काही घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कारभाराची चौकशी करुन कर्जदारांची फसवणूक करणाऱ्या संबंधित दोषी संचालकांवर तसेच बँकेच्या या प्रशासन कार्यपध्दतीवर (मोडस ऑपरेंडीवर) दंडात्मक कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. बँकेकडून त्यांच्या सभासदांना/सभासद सहकारी संस्थांना कर्ज देताना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ मधील नियम ३५ तसेच बॅंकेच्या उपविधीतील तरतूदीनुसार व बँकेचे संमत कर्ज धोरणानुसार कर्ज मंजूर करण्यात येते. तसेच बँकेच्या व्यक्तिगत कर्ज धोरणानुसार व उपविधीतील तरतूदीनुसार पात्र व्यक्तींना बँक कर्ज मंजूर करते.

बँकेने ज्या कर्जदारांना कर्ज मंजूर केले आहे त्यांना त्यांच्या मागणीनुसार मंजूर कर्जाची संपूर्ण उचल दिली जाते. कर्जदाराने ज्या कारणासाठी कर्ज घेतले आहे ते त्याच कारणाकरीता उपयोगात आणले आहे याबाबत कर्जाचा विनियोग बँकेकडून तपासला जातो. तथापि, कर्जदाराने ज्या कारणासाठी कर्ज घेतले आहे त्याच कारणाकरीता कर्जाचा विनियोग करणे ही जबाबदारी सर्वस्वी कर्जदार यांची आहे.

बँकेला व्यावसायिक कारणास्तव थकीत कर्जाची वसुली करणे आवश्यक आहे. त्यामुळे कर्जदारांनी घेतलेल्या कर्जाचे हप्ते नियमित न भरल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम १०१ अन्वये निबंधक, सहकारी संस्था यांचेकडून वसूली दाखला प्राप्त झाल्यानंतर बँकेमार्फत नियमानुसार कर्जाची रक्कम वसूल करण्यात येते. बँकेच्या कर्जवसुलीमुळे कर्जदारांनी आत्महत्या केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) बँकेमार्फत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ मधील तरतूदी तसेच बॅंकेच्या उपविधीतील तरतूदी त्याचप्रमाणे बँकेचे संमत कर्ज धोरणानुसार कर्ज मंजूरी, कर्जाची उचल, कर्ज वसूली प्रक्रिया करण्यात येते. त्यामुळे बँकेकडून कर्जदारांची फसवणूक केली जाते, अशी वस्तुस्थिती नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठातील १४ अधिविभागात विद्यार्थी संख्या घटली असल्याबाबत

**(१७) * २०९९ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठात सध्या २५० हून अधिक अभ्यासक्रम शिकविले जात असून यामध्ये पदव्युत्तर पदवीसह सर्टिफिकेट कोर्सचाही समावेश आहे, परंतु रोजगाराच्या संधीशी सांगड न घातल्याने १४ अधिविभागात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या वर्षात प्रवेश क्षमतेइतकेही विद्यार्थी मिळाले नसून मानव्यशास्त्र शाखेतही विद्यार्थी संख्या कमी होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पारंपारिक अभ्यासक्रमांऐवजी कौशल्य आधारित अभ्यासक्रमांकडे वाढलेला कल, वर्षांनुवर्षे प्राध्यापकांची रिक्त पदे, विद्यापीठातील अभ्यासक्रमांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नसणे, यामुळे विद्यार्थी संख्या घटत असल्याचा निष्कर्ष शिक्षण तज्ज्ञांकडून काढला जात असून सध्याचे अभ्यासक्रम हे कालसुसंगत नसल्याने नव्या शैक्षणिक धोरणात ज्या पध्दतीचे बदल अपेक्षित आहेत त्या गतीने बदल करुन हे अभ्यासक्रम रोजगाराभिमुख करावेत, असे मत शिक्षणतज्ज्ञ यांनी व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत कमी कालावधीच्या अभ्यासक्रमांतून तात्काळ नोकरी मिळविणाऱ्या अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा कल असल्याने शासनाने कमी कालावधीचे रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत तसेच या अभ्यासक्रमातून किती अभ्यासक्रम रोजगाराभिमुख आहेत व किती जणांना यातून रोजगार मिळाला आहे, यासंदर्भात शासनाने माहिती घेवुन येथे रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू करणे व येथील विद्यार्थ्यांसाठी नोकरीसाठी प्रयत्न करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रीयेचा आढावा घेण्यासाठी विद्यापीठाने गठीत केलेल्या प्रवेश आढावा समितीच्या अहवालानुसार विद्यापीठातील १४ अभ्यासक्रमांना प्रवेशक्षमतेपेक्षा कमी प्रवेश झाल्याचे निदर्शनास येत असून विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील जिल्ह्यांतील स्वायत्त महाविद्यालयांमध्ये व संलग्नित महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर शिक्षण केंद्रांची संख्या वाढल्याने त्या महाविद्यालयांमधून विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली आहे. तसेच, विद्यापीठातील अभ्यासक्रमांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पुरेशा प्रमाणात पोहचत नसल्याने विद्यार्थी संख्या कमी झाली आहे.
(३) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार निश्चित करण्यात करण्यात आलेल्या अभ्यासक्रम आराखडा व श्रेयांक आराखड्याची अंमलबजावणी राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांमध्ये सन २०२३-२४ पासून करण्यात येत आहे. या अभ्यासक्रम आराखड्यानुसार कौशल्य आधारीत कालसुसंगत अभ्यासक्रम शिवाजी विद्यापीठाने तयार केले आहेत. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विद्यापीठाने B.Com (B.F.S.I.), BBA/ MBA (Five years integrated), M.A. (Travel and Tourism), B.Sc- M.Sc (AI & ML), B.Sc- B.Ed. (४ Years Integrated Programme) इ. सारखे रोजगाराभिमूख अभ्यासक्रम सुरु केले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विविध विभागात नियुक्त पुरवठादाराकडून निकृष्ट दर्जाचे ड्रेनेज पॅलेटचा पुरवठा करण्यात येत असल्याबाबत

**(१८) * २१८९ श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अन्न व नागरी पुरवठा विभागाने विविध विभागात ड्रेनेज पॅलेट पुरवठा करणेकरीता खाजगी पुरवठादाराची नेमणूक केली असून ड्रेनेज पॅलेटचा पुरवठा करण्याचे कंत्राट देताना कंत्राटदाराने दिलेले दर निविदेतील दरापेक्षा कमी असून ड्रेनेज पॅलेटचा दर्जा कमी असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,ड्रेनेज पॅलेटचे कंत्राट मिळविण्याकरीता पुरवठादार कंत्राटदाराने अन्य कंत्राटदार किंवा कंपनीसोबत संयुक्त उपक्रम (ज्वॉईंट व्हेंचर) सुरु केला आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, संयुक्त उपक्रम सुरु करताना नियमानुसार कार्यवाही करण्यात आली आहे काय वा यासाठी नियमांत बदल केले आहेत याबाबत चौकशी करुन निकृष्ट दर्जाचे ड्रेनेज पॅलेट पुरवठा करणाऱ्या

पुरवठादारांवर कोणती कारवाई केली तसेच सदर कंत्राट रद्द करुन नवीन ठेकेदाराची नियुक्ती करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) शासन निर्णय दिनांक १५.०३.२०२४ अन्वये राज्यातील सर्व शासकीय धान्य गोदामांमध्ये अन्नधान्य साठविण्यासाठी ३,६५,१८२ डनेज पॅलेट खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यानुषंगाने राबविण्यात आलेल्या निविदाप्रक्रियेअंती श्री.बालाजी ॲन्ड कंपनी जनरल मटेरिअल सप्लायर दुर्गा चौक, गोंदिया यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

उक्त मान्यतेस अनुसरून राबविण्यात आलेल्या निविदाप्रक्रियेत खरेदीविषयक नियमावली विचारात घेऊन यशस्वी निविदाकाराच्या रू.३४००/- प्रति डनेज पॅलेट इतक्या दराने खरेदी करण्यास शासन निर्णय दिनांक १२.०६.२०२४ अन्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
डनेज पॅलेटचा दर्जाबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२.०१.२०२५ अन्वये डनेज पॅलेट बाबत केलेली तक्रार शासनास प्राप्त झालेली आहे.
(२) डनेज पॅलेट खरेदीबाबत प्रस्तावासाठी विनंती (RFP) मध्ये नमूद तरतुदीनसार श्री.बालाजी ॲन्ड कंपनी जनरल मटेरिअल सप्लायर दुर्गा चौक, गोंदिया या निविदाकारांने Shaktigarh Textile and industries LTD., Hoogli, West Bengal यांच्यासोबत Consortium करून निविदा सादर केलेली आहे.
(३) प्रश्नांकित मुद्याच्या अनुषंगाने क्षेत्रीय कार्यालयाकडून डनेज पॅलेटच्या दर्जा व गुणवत्ताबाबत अद्याप कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. तथापि, मा.लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तत्कालीन मा.मंत्री (अ.ना.पु.व ग्रा.सं.) महोदयांच्या मान्यतेअंती दिनांक २४.०२.२०२५ अन्वये दिनांक २१.०६.२०२४ व दिनांक १३.१२.२०२४ च्या पुरवठा आदेशास प्रस्तुत प्रकरणी पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यात आलेली असून निविदेमधील तरतुदीनुसार उत्पादनाचा दर्जा व गुणवत्ता तपासण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयातील प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१९) * ३७२ श्री.किरण सरनाईक, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ११ सार्वजनिक विद्यापीठे आणि १ हजार ७६३ अनुदानित महाविद्यालयांमध्ये ३३ हजार ७६३ प्राध्यापकांची पदे मंजूर असून त्यातील २१ हजार २३६ पदांवर सद्य:स्थितीत प्राध्यापक कार्यरत असून १२,५२७ प्राध्यापकांच्या जागा रिक्त असल्याने विद्यापीठ व महाविद्यालयातील प्राध्यापकांची पदे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नवीन नियमाप्रमाणे भरणे आवश्यक असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या रिक्त असलेल्या जागांवर तासिका तत्त्वावरील प्राध्यापक काम करत असल्यामुळे तसेच पूर्णवेळ प्राध्यापक उपलब्ध नसल्यामुळे उच्च शिक्षणाचा दर्जा खालावला असल्याचे विविध

सर्वेक्षणातून निदर्शनास आल्याने राज्य लोकसेवा आयोगामार्फत प्राध्यापकांची भरती करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, तथापि, लोकसेवा आयोगाकडे यापूर्वीच अनेक परीक्षा व पदभरतीचे काम प्रलंबित असल्यामुळे प्राध्यापक भरतीचे काम विद्यापीठास देण्यात यावे, अशी मागणी प्रस्तुत लोकप्रतिनिधी तसेच विविध संघटनांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठ आणि महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून, विद्यार्थ्यांना खाजगी शिकवण्या घेण्याची आवश्यकता असल्याने खाजगी शिकवण्यामध्ये वाढ झाली असून, केंद्र शासनाने जाहीर केलेल्या नवीन राष्ट्रीय धोरणाच्या (एनईपी) अंमलबजावणीसाठी प्राध्यापकांसह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेची हानी टाळण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नवीन नियमाप्रमाणे विद्यापीठ व महाविद्यालयातील प्राध्यापक भरती करणेबाबत तसेच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (New Education Policy) यशस्वी अंमलबजावणीसाठी तसेच ११ सार्वजनिक विद्यापीठे आणि १ हजार ७६३ अनुदानित महाविद्यालयांमधील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अंमलबजावणीवर आधारित उच्च शिक्षण संस्थांचे (HEI) चे मूल्यमापन करण्याचा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाकडून घेण्यात आला आहे. शैक्षणिक संस्थेने किमान ७५ टक्के अध्यापकांची, नियमित / कायमस्वरूपी नियुक्ती करणे हा त्यापैकी एक मापदंड आहे. त्यासंदर्भातील सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रसिध्द केली असून संबंधितांकडून सूचना/प्रतिक्रिया मागविण्यात आल्या आहेत.

(२), (३) व (४) राज्यातील अकृषी विद्यापीठांमधील अध्यापकीय पदांच्या ८० टक्के मर्यादेत पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. अकृषी विद्यापीठांकडून करण्यात येणाऱ्या अध्यापकीय पदांच्या निवडप्रक्रियेची कार्यपध्दती विहित करण्याचे आदेश दिनांक २८/०२/२०२५ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. सदर निवडप्रक्रियेनुसार अकृषी विद्यापीठांमध्ये सध्या सुरू असणारी अध्यापकांची निवड प्रक्रिया पूर्ण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी वित्त विभागास सादर करण्यात आला होता.वित्त विभागाने विचारणा केलेल्या मुद्द्यांच्या तपशिलासह सदर प्रस्ताव वित्त विभागास फेरसादर करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर येथील भाग्यलक्ष्मी मल्टीस्टेट को.ऑ.क्रे.सो.लि. या संस्थेने गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याबाबत

**(२०) * १३०० श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर येथील भाग्यलक्ष्मी मल्टीस्टेट को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि. (पतसंस्था) या संस्थेच्या जिल्ह्यात १८ शाखा असून जिल्ह्यातील अनेक ठेवीदारांनी उक्त पतसंस्थेत गुंतवणूक केली होती, तथापि,

गत काही महिन्यांपासून सदरहू पतसंस्थेचे कार्यालय बंद असून संस्थेचे संचालक मंडळ, चेअरमन व कर्मचारी वर्ग फरार झाले असल्याने ठेवीदारांची आर्थिक फसवणूक झाली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठेवीदारांनी सदरहू पतसंस्थेच्या संचालक मंडळ व कर्मचारी वर्ग यांचेविरुध्द दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी वा त्यासुमारास पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांचेकडे तक्रार अर्ज दाखल करुनही अद्यापी कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने उक्त संस्थेत गुंतवणूक केलेली ठेवीदारांची रक्कम त्यांना परत देण्याच्या दृष्टीने सदरहू संस्थेच्या संचालक मंडळ व अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत व चौकशीस दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) ठेवीदारांनी सदरहू पतसंस्थेच्या संचालक मंडळ व कर्मचारी वर्ग यांचेविरुध्द पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांचेकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे, हे खरे आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, अहिल्यानगर येथे संस्थेच्या संचालक मंडळ, सदस्य व कर्मचारी अशा एकूण १८ व्यक्तींविरूध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३१६(५), ३१८(३), (४) ६१(२) तसेच महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम, १९९९ च्या कलम ३ अन्वये रुपये ९४,१४,२९६/- रकमेच्या अपहाराबाबत प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आला आहे.

एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, अहिल्यानगर यांच्याकडून १३ व्यक्तींवर दोषारोपपत्र बजावण्यात आले असून त्यापैकी ६ व्यक्तींना अटक करण्यात आले आहे.

(३) सदर प्रकरणामध्ये एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, अहिल्यानगर यांच्याकडून दिनांक ०१/०३/२०२५ रोजी मा.जिल्हा सत्र न्यायालय, अहिल्यानगर येथे दोषारोपपत्र (चार्जशीट) दाखल करण्यात आले आहे.

मल्टीस्टेट सहकारी संस्था या केंद्रीय निबंधक कार्यालयाच्या नियंत्रणाखालील संस्था आहेत. त्यामुळे भाग्यलक्ष्मी मल्टीस्टेट को. ऑप क्रेडिट सोसायटी लि. या संस्थेकडील ठेवी मिळत नसल्याच्या तक्रारी पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव सहकार आयुक्त कार्यालयाकडून दिनांक ९/१२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये मा.केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडे पाठविण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वर्धा जिल्ह्यातील वायगाव हळदीला बाजारपेठ मिळवून देणेबाबत

**(२१) * २१४२ श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील प्रसिध्द वायगाव हळदीला स्थानिक पातळीवर बाजारपेठ नसल्याने तेथील हळद उत्पादक शेतकऱ्यांकडून व्यापारी कमी दराने हळद खरेदी करून ही हळद चढत्या दराने विकत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वायगाव येथील हळद उत्पादक शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवर बाजारपेठ आणि हळद प्रक्रिया उद्योग केंद्र उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादीत हळदीला योग्य मोबदला मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यांसदर्भात शासनाने माहिती घेवून वर्धा जिल्ह्यातील वायगाव हळदीला स्थानिक पातळीवर शेतकऱ्यांना रास्त भाव मिळावा याकरीता बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी व हळद प्रक्रिया उद्योग केंद्र स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

कृषी उत्पन्न बाजार समिती, समुद्रपूर येथे कमी दराने हळद खरेदी करुन ही हळद चढत्या दराने विकत असल्याबाबतची कोणत्याही प्रकारची तक्रार बाजार समितीकडे प्राप्त झालेली नाही.
(२) व (३) हे खरे नाही.

वायगाव हळदी हे गाव समुद्रपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात असून सदर ठिकाणी हळदीचा खुल्या पध्दतीने/लिलावाद्वारे व्यापार होत नाही. वायगाव हळदीमधील हळद उत्पादक शेतकरी स्थानिक व बाहेरील व्यापाऱ्यांना किमान रुपये २५०००/- ते कमाल रुपये ३०,०००/- प्रति क्विंटल दराने हळद विक्री करतात. वर्धा जिल्ह्यातील वायगाव येथे हळद प्रक्रिया उद्योग केंद्र स्थापन करण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्याबाबत नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात सोयाबीन खरेदी केंद्रे बारदानाअभावी बंद असल्याबाबत

**(२२) * ४४ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत पाटील, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.अरुण लाड, श्री.शशिकांत शिंदे, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नाफेड व एनसीसीएफच्या मदतीने ५६२ सोयाबीन खरेदी केंद्रे सुरु असून या दोन्ही संस्थांना १४ लाख १३ हजार मेट्रिक टन सोयाबीन खरेदीचे उद्दिष्ट असताना केवळ तीन महिन्यांत ३० टक्केच उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले आहे, दिनांक १२ जानेवारी, २०२५ रोजी या खरेदीची मुदत संपणार असून केवळ

बारदान्याअभावी बहुतांश केंद्रांवरील सोयाबीन खरेदी बंद आहे तसेच सांगली व मराठवाड्यातील लातुर, वसमत (जि.हिंगोली) व चिखलीसह (जि.बुलढाणा) अनेक हमीभाव खरेदी केंद्रावरचा सोयाबीन खरेदीसाठी ५० किलोची पोती उपलब्ध नसल्याने व नाफेडकडून बारदानाचा पुरवठा होत नसल्यामुळे अनेक शासकीय सोयाबीन खरेदी केंद्र दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ पासून बंद झाली आहे, मराठवाड्यातील हमीभाव केंद्राकरिता ४८ लाख बारदानांची मागणी असून, बारदानांअभावी सोयाबीन खरेदी बंद असल्याने श्री.ज्ञानेश्वर दिनकर साबळे (रा.डोंगरी शेवली, जि.बुलढाणा) या शेतकऱ्याने अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला असल्याची घटना दिनांक ४ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरोरा (चंद्रपूर) येथील सुमारे २६०० शेतकऱ्यांनी सोयाबीन हमीभावाने विक्री करण्यासाठी नोंदणी करून पाच महिन्यांचा कालावधी होऊन केवळ ५०० शेतकऱ्यांचा सोयाबीन या हमीभाव केंद्रांनी खरेदी केल्याने हजारो शेतकरी अद्याप हमीभावाने सोयाबीन विक्रीच्या प्रतीक्षेत असल्याने तसेच बारदानाच्या तुटवड्यामुळे सोयाबीन खरेदी बंद झाल्याने सोयाबीन खरेदीसाठी नोंदणी केलेले ७५ टक्के शेतकरी हमीभावाच्या सोयाबीन खरेदीपासून वंचित असून सोयाबीन पिकाला विशेष अनुदानातून दरवाढ देण्याबाबत शासनाने जाहीर केले असूनही गत दोन वर्षांपासून सोयाबीनला अपेक्षित हमीभाव मिळत नसल्याने बाजारातही हमीभावापेक्षा कमी भाव मिळत असून, खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सोयाबीन विक्रीसाठी आणले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना खरेदी केंद्रावर दररोज यावे लागत असताना मालवाहतुकीसाठी आणलेल्या वाहनांचे भाडे शेतकऱ्यांना भरावे लागत असून त्यांना सोयाबीन विक्री करेपर्यंत मोठा भुर्दंड भरावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने हमीभाव खरेदीपासून एकही सोयाबीन उत्पादक शेतकरी वंचित राहू नये तसेच बारदानाचा पुरवठा करण्याबाबत व मालवाहतुकीसाठी आणलेल्या वाहनांचे दैनिक भाडे शेतकऱ्यांना देण्याबाबत तसेच नाफेडच्या खरेदी केंद्रावर सोयाबीन,कापूस,धान व इतर धान्य नोंदणी केलेल्या हजारो शेतकऱ्यांची धान्य खरेदी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे अंशत: खरे आहे.

सोयाबीन खरेदीसाठी दिनांक १/१०/२०२४ पासून ऑनलाईन शेतकरी नोंदणी सुरू केली असून सदर मुदत दिनांक ६/०१/२०२५ पर्यंत वेळोवेळी वाढविण्यात आली. तसेच दिनांक १५/१०/२०२४ पासून प्रत्यक्ष खरेदी सुरू केली असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार ९० दिवसांची मुदत दिनांक १२/०१/२०२५ पर्यंत होती. मात्र शेतकरी नोंदणीचे प्रमाण विचारात घेऊन खरेदी प्रक्रीयेस राज्य शासनाच्या विनंतीनुसार केंद्र शासनाच्या मान्यतेने दुसरी मुदतवाढ दिनांक ३१/०१/२०२५ पर्यंत व राज्याच्या विशेष विनंतीनुसार तिसरी मुदतवाढ दिनांक ०६/०२/२०२५ पर्यंत एकूण २४ दिवस मुदतवाढ देण्यात आली आहे. सोयाबीन खरेदीसाठी २ वेळा केंद्र शासनातर्फे मुदतवाढ घेणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. राज्यात शेतकरी नोंदणी मोठ्या प्रमाणात झाली असल्याने चौथी मुदतवाढ देण्याची राज्य शासनाने दिनांक ०६/०२/२०२५ च्या पत्रान्वये केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयास विनंती केली आहे.

राज्यात दिनांक ०६/०२/२०२५ अखेर एकूण ५,११,६५७ शेतकऱ्यांकडून ११,२१,३८५ मे.टन सोयाबीन खरेदी करण्यात आला.

सोयाबीनची खरेदी मोठ्या प्रमाणात केली असल्याने सुरवातीस नाफेड निर्देशानुसार नवीन स्पेसिफिकेशनचा बारदाना उपलब्ध होण्यास अंशत: विलंब झाला मात्र नाफेडच्या निर्देशानुसार नवीन छापील बारदाना निविदा प्रक्रीया राबवून उपलब्ध करून खरेदी प्रक्रीया पूर्ण करण्यात आली.

चिखली (जि.बुलढाणा) येथे खरेदी केंद्रावर बारदानाअभावी सोयाबीन खरेदी बंद नव्हती. श्री.ज्ञानेश्वर दिनकर साबळे (रा.डोंगरी शेवली) यांनी विक्रीकरीता आणलेले सोयाबीन FAQ गुणवत्तेच्या निकषाप्रमाणे नसल्याने सदर शेतकऱ्याचे सोयाबीन परत करण्यात आले होते. त्यामुळे सदर शेतकऱ्याने खरेदी केंद्रावर गोंधळ घालून खरेदी बंद पाडली होती.

(२) हे अंशत: खरे आहे.

सन २०२४ च्या हंगामामध्ये किमान आधारभूत योजनेंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यात ३७७१ शेतकऱ्यांकडून ८१,०३६ क्विंटल इतकी सोयाबीनची खरेदी झालेली आहे.

(३) नाही.

दैनंदिन खरेदीची क्षमता विचारात घेवून शेतकऱ्यांना खरेदीसाठीचे एसएमएस (SMS) देवून शेतमाल विक्रीकरीता आणण्याबाबत बोलविण्यात येत होते. त्यामुळे शेतकऱ्यांना मालवाहतुकीसाठी आणलेल्या वाहनांचे भाडेसाठीचा आर्थिक भुर्दंड भरावा लागत असण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) राज्यात दिनांक १५/१०/२०२४ ते दिनांक ०६/०२/२०२५ या कालावधीत एकूण ५६२ खरेदी केंद्रावर एकूण ११,२१,३८५ मे.टन सोयाबीन खरेदी करण्यात आला. नाफेडच्या स्पेसिफिकेशननुसार ई-निविदा प्रक्रीया राबवून नवीन छापील बारदाना उपलब्ध करून खरेदी प्रक्रीया पूर्ण करण्यात आली.

सन २०२४-२५ साठी केंद्र शासनाने घोषित केलेल्या हमीभावाने कापूस खरेदीसाठी केंद्र शासनाची कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडिया (सी.सी.आय.) ही मुख्य अभिकर्ता संस्था असून त्यांच्यामार्फत राज्यात १२४ खरेदी केंद्र सुरु करण्यात आली असून दिनांक ०५/०३/२०२५ अखेर १३८ लाख क्विंटल खरेदी करण्यात आली आहे.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत हमीभावाने दिनांक ०६ मार्च, २०२५ अखेर ७,३५,४४१ शेतकऱ्यांकडून ९,३६,८५२ मे.टन धान खरेदी करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या ढोकाळी येथील उपकेंद्राच्या संचालकांच्या कामकाजाची चौकशी करण्याबाबत

**(२३) * ४ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठावरील प्रशासकीय ताण कमी करण्यासाठी काही वर्षांपूर्वी सुरू झालेल्या ढोकाळी येथील उपकेंद्रात तेथील संचालकांच्या दडपशाही वर्तनामुळे विधी विभागातील तीन विद्यार्थीनींना बलात्काराच्या धमक्यांच्या चिठ्ठ्या येऊनदेखील त्याची दखल न घेण्याचा प्रकार ठाणे जिल्हा अखिल

भारतीय विद्यार्थी परिषदेने माहे डिसेंबर, २०२४ मध्ये कुलगुरू,मुंबई विद्यापीठ यांच्या निदर्शनास आणला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यासाठी समिती नेमण्याचे आदेश कुलगुरू यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विधी विभागातील तीन विद्यार्थीनींना बलात्काराच्या धमक्यांच्या चिठ्ठ्या पाठविणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) मुंबई विद्यापीठाचे ठाणे येथील धर्मवीर आनंद दिघे उपकेंद्रातील विधी विभागातील तीन विद्यार्थीनींना बलात्काराच्या धमक्यांच्या चिठ्ठया मिळाल्याबाबतची तक्रार संचालक, उपकेंद्र ठाणे यांना प्राप्त झाली होती. त्याअनुषंगाने तक्रारीच्या प्रथमदर्शनी गांर्भीय लक्षात घेता संबंधित विद्यार्थ्यांना चौकशीच्या अधिन राहून निलंबित करण्यात आले होते. व सदर तक्रार विद्यापीठाच्या अंतर्गत तक्रार समितीकडे वर्ग करण्यात आली होती. त्याअनुषंगाने अंतर्गततक्रार समितीच्या अहवालानुसार सदर प्रकार गंभीर असल्यामुळे सदर संशयीत विद्यार्थ्यांना त्यांच्या गैरवर्तुणुकीबाबत सक्तीचे ताकीदपत्र देण्यात आले. तसेच संशयीत विद्यार्थ्यांकडून स्टॅम्प पेपरवर त्यांच्या भविष्यातील चांगल्या वर्तुणुकीबाबत हमीपत्र घेण्यात आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्या शासकीय धान खरेदी केंद्राकडे शेतकऱ्यांची देयके थकीत असल्याबाबत

**(२४) * २०४ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हा मार्केटींग फेडरेशनच्या शासकीय धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री करणाऱ्या ६० हजार शेतकऱ्यांच्या धानाची देयके (चुकारे) मागील दीड महिन्यांपासून थकीत असून सदर रकमेसाठी शेतकऱ्यांना धान खरेदी केंद्रामध्ये तसेच बँकांमध्ये वारंवार ये-जा करावी लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर थकीत देयके शेतकऱ्यांना लवकरात लवकर अदा करण्याच्या दृष्टीने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) व (२) धान खरेदी पोर्टलवरील तांत्रिक अडचणींमुळे शेतकऱ्यांचे चुकारे करण्यासाठी विलंब झाला. तथापि, तांत्रिक अडचणींचे निराकरण करुन ६२,९३४ शेतकऱ्यांचे ४५४.९०

कोटींचे चुकारे माहे फेब्रुवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात अदा करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील नोकर भरतीतील एससी, एसटी व ओबीसी प्रवर्गाचे आरक्षणाबाबत

**(२५) * १३५८ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील नोकर भरतीतील एससी, एसटी व ओबीसी प्रवर्गाचे आरक्षण संपुष्टात आणल्याच्या निषेधार्थ आरक्षण बचाव समितीने ठिय्या आंदोलन करून विभागीय सहनिबंधकांना निवेदन दिले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा बँकेतील नोकर भरतीची सविस्तर चौकशी करून एससी, एसटी व ओबीसी प्रवर्गाबरोबरच सर्वांना न्याय देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

विभागीय सह निबंधक, नागपूर या कार्यालयास चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील नोकर भरतीतील आर्थिक गैरव्यवहाराची सखोल चौकशी करण्याबाबतचे निवेदन दिनांक १२/०१/२०२५ रोजी प्राप्त झाले आहे.
(२) चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नोकरभरती प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर यांना दिनांक ३०/०१/२०२५ रोजी चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार सदर चौकशी सद्य:स्थितीत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांसाठी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम स्विकारण्यात येणार असल्याबाबत

**(२६) * १४४२ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यातील इयत्ता तिसरी ते बारावीच्या शाळांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) अभ्यासक्रमाच्या आराखड्याला सुकाणू समितीने मान्यता दिली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य मंडळांच्या शाळांसाठी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचा (सीबीएसईचा) बहुतांश अभ्यासक्रम स्विकारण्यात येणार असून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून अभ्यासक्रमात बदल करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, 'सीबीएसई' अंतर्गत असलेली पाठ्यपुस्तके इंग्रजी व हिंदी माध्यमात उपलब्ध आहेत, मराठीसह अन्य माध्यमांसाठी ती उपलब्ध करून दिली जाणार असून राज्य मंडळांच्या शाळांचे वार्षिक वेळापत्रक १५ जून पासून सुरु होत असून नवीन शैक्षणिक सीबीएसईच्या वार्षिक वेळापत्रकानुसार १ एप्रिलपासून सत्राची सुरुवात करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सीबीएसई' अंतर्गत असलेली पाठ्यपुस्तके मराठीसह, अन्य माध्यमांसाठी ती उपलब्ध करून देण्याबाबत तसेच शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सीबीएसईच्या वार्षिक वेळापत्रकानुसार १ एप्रिलपासून नवीन शैक्षणिक सत्राची सुरुवात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३), (४) व (५) राज्य अभ्यासक्रम आराखड्याला सुकाणू समितीने मान्यता दिलेली असून त्याच्या अंमलबजावणीसंदर्भात विचार-विनिमय सुरू आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## कांदिवली (पूर्व)(मुंबई) येथील सेंट लॉरेन्स शाळेत शालेय शुल्क न भरणाऱ्या विद्यार्थिनीला प्रवेशबंदी केल्याबाबत

**(२७) * १६१८ श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली (पूर्व) येथील सेंट लॉरेन्स शाळेतील दहावी इयत्तेत शिकणाऱ्या एका विद्यार्थिनीने शालेय शुल्क भरले नसल्याने तिला शाळा सुरू झाल्यापासून शाळेमध्ये बसण्याची अनुमती नाकारली असल्याचे दिनांक ३० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत ग्लोबल पेरेंट्स टीचर असोसिएशनने राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे तदनुषंगाने विद्यार्थिनीचे शैक्षणिक भवितव्य अडचणीत आणणाऱ्या संबंधित शाळा प्रशासनाविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने कोणत्याही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होणार नाही व विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही याबाबत दक्षता बाळगण्याच्या सुचना शाळेला देण्यात आल्या आहेत. त्यानुसार सदर विद्यार्थिनीचा इ.१० वी च्या परीक्षेसाठी फॉर्म भरण्यात आला असून प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षा झाली आहे आणि सदर विद्यार्थिनीने बोर्डाचा मराठी या विषयाचा पेपरही दिला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे सातीवली (ता.वसई, जि.पालघर) येथील "इंपिरियल पब्लिक स्कूल" या संस्थेची शाळा विनापरवानगी सुरु असल्याबाबत

**(२८)** * **१३०१ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सातीवली (ता.वसई, जि.पालघर) येथील जी प्रभागामध्ये "इंपिरियल पब्लिक स्कूल" या संस्थेची शाळा विनापरवानगी सुरु असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मा.विरोधी पक्षनेते, अनेक सामाजिक संस्था व स्थानिक नागरिक यांनी शिक्षणाधिकारी, पालघर यांचेकडे पत्राव्दारे तक्रार करुनही अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळा महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता सुरु असून वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात अनेक शाळा विनापरवानगी सुरु असणे, शाळेमध्ये कोणत्याही प्रकारचे सुरक्षेचे उपाय नसणे, योग्य शैक्षणिक गुणवत्ता तसेच आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्यामुळे आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांच्याकडेदेखील तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अवैधरित्या सुरु असलेल्या वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील शाळा बंद करुन सदरहू शाळांवर कारवाई करण्यास विलंब करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) सदर इंग्रजी माध्यमाच्या (प्राथमिक ते उच्च माध्यमिक) शाळेचे स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर काम सुरू करण्यास दिनांक ०३/१२/२०२१ रोजी इरादा पत्र तर दिनांक ०४/०३/२०२४ रोजी मान्यता पत्र देण्यात आले आहे. सदर शाळेने इरादापत्र प्राप्त झाल्यानंतर २०२३-२०२४ पासून शाळा सुरु केली होती. सदरहू शाळेस गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती, वसई यांनी दिनांक ०८/०४/२०२३ रोजी शाळा बंद करण्याबाबत नोटीस बजावली होती. त्यास अनुसरुन शाळा व्यवस्थापनाने दिनांक २७/०४/२०२३ रोजी शाळा बंद केली आहे.

(२) हे खरे नाही.

सदर संस्थेने शाळा सुरू करण्यास इरादा पत्र प्राप्त झाल्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून शाळा सुरू केली होती. सदर शाळा अनधिकृत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर गटशिक्षणाधिकारी,

पंचायत समिती, वसई यांनी केंद्रप्रमुख यांचेमार्फत संस्थेला शाळा बंद करण्याची सूचना दिली होती. त्यानुषंगाने सदर संस्थेने दिनांक २७/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शाळा बंद केली. सदर शाळेस दिनांक ०४/०३/२०२४ रोजी मान्यता पत्र प्राप्त झाल्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शाळा सुरू करण्यात आली आहे. मा.विरोधी पक्षनेते यांनी शाळा अनधिकृत असल्याबाबतची तक्रार दिनांक २२/०८/२०२४ रोजी केली होती. तत्पूर्वीच सदर शाळेला शाळा सुरु करण्याबाबतचे मान्यतापत्र प्राप्त झाल्याने, तक्रारीच्या दिनांकास शाळा अनधिकृत सुरु नव्हती. त्यामुळे त्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

वसई-विरार महानगरपालिका हद्दीत मान्यतेविना अनधिकृपणे सुरू असलेल्या २९ प्राथमिक शाळा तसेच, २० माध्यमिक शाळांना द्रव्यदंडाची नोटीस बजावण्यात आली असून फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ च्या कलम १८(५) मधील तरतुदीनुसार शासन मान्यतेशिवाय अनधिकृतरित्या सुरू असणाऱ्या शाळांविरूध्द कारवाई करण्याचे निर्देश शासन निर्णय दिनांक १९/०६/२०१० व दिनांक १०/११/२०२० व दिनांक १८/१२/२०२३ अन्वये देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कांदा निर्यात शुल्क रद्द करण्याबाबत

**(२९) * ११३० श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.अरुण लाड, श्री.शशिकांत शिंदे, श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खरीप हंगामाबरोबर उशिरा लागवड केलेल्या कांदयाची आवक सुरु झाली असून कांदयावर २० टक्के निर्यात शुल्क आकारल्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत आला असून शेतकऱ्यांपुढे मोठे आर्थिक संकट निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क माफ करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे प्रयत्न करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १९ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २० डिसेंबर, २०२४ रोजी मा.उपमुख्यमंत्री (वित्त) हे नाशिक दौऱ्यावर असताना, लासलगाव येथील कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी निर्यात शुल्क रद्द करण्याबाबत विनंती केल्यावर त्याबाबत पाठपुरावा करण्याचे मा.उपमुख्यमंत्री यांनी आश्वासन दिले मात्र अद्याप त्याप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी, शासनाने निर्यात शुल्क माफीबाबतचा निर्णय लवकर न घेतल्यास राज्यातील कांदा बाजारपेठा बंद करण्याचा इशारा देण्यात आला असून कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क तात्काळ रद्द करून शून्य टक्के करण्यासाठी शेतकऱ्यांनी दिनांक १३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास लासलगाव (जि.नाशिक) बाजार समितीमध्ये आंदोलन करून लिलाव बंद पाडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द करून शून्य टक्के करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) हे खरे नाही.
(४) होय.
(५) कांदा निर्यात संदर्भात धोरण ठरवणे ही बाब केंद्र शासनाशी निगडीत आहे.

कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द करण्यासंदर्भात शासनातर्फे दिनांक १८/१२/२०२४ व दिनांक ०४/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास विनंती केली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील माध्यमिक शाळेमधील प्रयोगशाळा सहाय्यक पदे अतिरिक्त होत असल्याबाबत

**(३०) * ५६ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध दिनांक २८ जानेवारी,२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजूर झालेला असून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील माध्यमिक शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सन २०२३-२४ चे संच मान्यता झालेली असून त्यानुसार इयत्ता नववी- दहावीच्या २०१ विद्यार्थ्यांमागे १ प्रयोगशाळा सहाय्यक पद मंजूर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निकषामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सध्या कार्यरत असणारे १७ प्रयोगशाळा सहाय्यकांपैकी १४ प्रयोगशाळा सहाय्यक अतिरिक्त होत असून प्राथमिक विभागाचेही कनिष्ठ लिपिक अतिरिक्त झालेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या शासन निर्णयानुसार नवीन पद निर्माण होण्याची शक्यता कमी झाली असून ग्रंथपाल आणि प्रयोगशाळा सहाय्यक हे विद्यार्थी संख्येवर नेमल्याने अनेक शाळांमधील पदे अतिरिक्त होऊन प्रयोगशाळा आणि ग्रंथालय बंद होणार असून अतिरिक्त प्रयोगशाळा सहाय्यक यांचे समायोजन करणे कठीण जात असल्याने सिंधुदुर्गातील विद्यार्थ्यांचे प्रयोगशाळेत गैरसोय होत असल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, निर्णयाचा विचार करून पूर्वीप्रमाणेच इयत्ता पाचवी ते दहावी विद्यार्थी संख्या लक्षात घेऊन प्रयोगशाळा सहाय्यक पद ठेवावे किंवा विद्यार्थ्यांची अट शिथील करावी अशा मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीप्रमाणे इयत्ता पाचवी ते दहावी विद्यार्थी संख्या लक्षात घेऊन प्रयोगशाळा सहाय्यक तसेच ग्रंथपाल पद ठेवावे किंवा विद्यार्थ्यांची अट शिथिल करावी याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक २८/०१/२०१९ मधील सुधारित आकृतीबंधानुसार अतिरिक्त ठरणाऱ्या प्रयोगशाळा सहाय्यकांच्या समायोजन प्रक्रियेला रिट पिटीशन क्र.१३९५२/२०२४ अन्वये स्थगिती देण्यात आलेली आहे. सदर रिट याचिकेतील पुढील सुनावणी दिनांक ०७/०४/२०२५ रोजी नियोजित आहे. शासन निर्णय दिनांक २८/०१/२०१९ अन्वये अतिरिक्त ठरणाऱ्या कार्यरत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संदर्भात करावयाची कार्यवाही व समावेशनाच्या कार्यपध्दतीचे स्पष्टीकरणात्मक आदेश शासन निर्णय दिनांक ०७/०३/२०१९ अन्वये निर्गमित करण्यात आले आहे.
(४) हे खरे आहे.
(५) शासन निर्णय दिनांक २८/०१/२०१९ मधील निकष हे वित्त विभागाच्या उच्चस्तरीय समितीच्या दिनांक १३/११/२०१८ रोजी झालेल्या बैठकीमधील निर्णयानुसार निर्गमित करण्यात आले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लाखांदूर (जि.भंडारा) येथील दि महाराष्ट्र रूरल एज्यु. सोसायटी या संस्थेने चुकीची माहिती सादर करुन अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र मिळविल्याबाबत

**(३१)** * **१२६९ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाखांदूर (जि.भंडारा) येथील दि महाराष्ट्र रूरल एज्युकेशन सोसायटी र.न.ई.३० (भ) या संस्थेने शासनाच्या अल्पसंख्यांक विभागाला खोटी आणि चुकीची माहिती सादर करून संस्थेला अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र मिळविल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी संस्थेच्या सभासदांवर फौजदारी गुन्ह्याची नोंद करण्याची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अल्पसंख्यांक विभागाला खोटी आणि चुकीची माहिती सादर करून संस्थेला अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र मिळविणाऱ्या संबंधित संस्थेच्या दोषी सभासदांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) सदर संस्थेस दिनांक २४/१०/२०२४ रोजी अल्पसंख्याक प्रमाणपत्र देण्यात आले असून सदर संस्थेने चुकीची माहिती सादर करून अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र मिळविल्याबाबतची तक्रार प्राप्त झाली आहे.

(२) होय.

(३) व (४) विभागास प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि महाराष्ट्र रूरल एज्युकेशन सोसायटी या संस्थेस १५ दिवसाच्या आत खुलासा सादर करणेबाबत दिनांक २५/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यास अनुसरून संस्थेकडुन दिनांक १०/०३/२०२५ रोजी खुलासा प्राप्त झाला असून, खुलाश्याच्या अनुषंगाने प्रस्तूत प्रकरणी विभागस्तरावर उचित कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील २६ शाळा पटसंख्येअभावी बंद झाल्याने या शाळांमधील विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याबाबत

**(३२)** * **१३६५ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील २६ शाळा पटसंख्येअभावी बंद झाल्याने या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये अलिबाग तालुक्यातील २, पेण तालुक्यातील २, कर्जत तालुक्यातील १, रोहा तालुक्यातील ६, माणगाव तालुक्यातील ६, श्रीवर्धन तालुक्यातील ३, पोलादपूर तालुक्यातील ३, महाड तालुक्यातील ३ इत्यादी दुर्गम भागातील शाळांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्ह्याची भौगोलिक स्थिती पहाता या दुर्गम भागातील शाळा पुन्हा सुरु करण्यासाठी तसेच शासकीय शाळांमधील पटसंख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही / उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) रायगड जिल्ह्यातील २६ जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थी उपलब्ध नसल्यामुळे सदर शाळा बंद झालेल्या आहेत. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये या शाळांमधील बहुतांश विद्यार्थी प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्याने अन्य जिल्हा परिषद शाळांमध्ये पुढील शिक्षण घेत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गैरसोय झालेली नाही.

(२) हे खरे आहे.

ग्रामविकास विभाग, शासन निर्णय, दिनांक ०७/०४/२०२१ अन्वये सर्वसाधारण व अवघड क्षेत्रनिहाय शाळांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार अवघड क्षेत्रातील एकूण ६७९ शाळांपैकी १३ शाळा बंद झाल्या असून उर्वरित ६६६ शाळा कार्यान्वित आहेत. तसेच जिल्ह्यातील सर्वसाधारण क्षेत्रामध्ये एकूण १८४९ शाळांपैकी १३ शाळा बंद झाल्या असून उर्वरित १८३६ शाळा कार्यान्वित आहेत.

(३) राज्यातील मराठी माध्यमांच्या प्राथमिक शाळांची पटसंख्या वाढविण्यासाठी तसेच गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांचे वेळोवेळी प्रशिक्षण आयोजित करुन शिक्षकांची कार्यक्षमता वाढवून सरकारी शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. विद्यार्थी गुणवत्ता वाढ करण्याच्या अनुषंगाने सरकारी शाळांमध्ये महत्वपूर्ण शैक्षणिक उपक्रम- पुनर्रचित सेतू अभ्यास, शाळा पुर्व तयारी मेळावे, पायाभूत भाषिक साक्षरता व गणितीय विकसन कार्यक्रम (निपुण महाराष्ट्र अभियान), इयत्ता १ ली विद्यार्थी प्रवेश शाळापूर्व तयारी कार्यक्रम अंमलबाजवणी, नियमित मूल्यमापन योजना, आनंददायी अभ्यासक्रम, पूरक अध्ययन साहित्याचा वापर, शाळा सुशोभिकरण, शालेय परिसर स्वच्छता, मोफत गणवेश योजना, मोफत पाठ्यपुस्तके, शालेय पोषण आहार योजना, समग्र शिक्षा अभियान तसेच जिल्हा नियोजन व विकास समितीच्या माध्यमातून शाळांमधील भौतिक सुविधांचा विकास इत्यादी योजनांद्वारे पटसंख्या वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१)(कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.